**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १५४४/२००७**

**१) श्री गजानन मधुकर इंगळे,**
**रोकडीया हनुमान नगर, शेगांव**
**ता.शेगांव, जिल्हा बुलढाणा.** **अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी**
**अनुसूचित जमाती जात प्रमाणपत्र तपासणी समिती,**
**आदिवासी भवन, गिरीपेठ, नागपर.**

**३) जन माहिती अधिकारी**
**अनुसूचित जमाती जात प्रमाणपत्र तपासणी समिती,**
**आदिवासी भवन, गिरीपेठ, नागपर.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक १५.७.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये प्रथम अपील दाखल केली आहे. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमतीने गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१२.२००६ रोजी माहिती अधिकारी, अनुसूचित जमाती जात प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते, ती येणेप्रमाणे - " अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती नागपूर कडे अनुसूचित ठाकूर ठाकर जमातीचा दावा करणा-या उमेदवाराची प्रलंबित प्रकरणाची यादी (नांव, पत्ता, दाखल दिनांक) (२) समितीकडे ठाकूर, ठाकर जमातीचा जात प्रमाण पत्राकरीता अपील प्रकरणाची यादी. (३) नागपूर समिती द्वारा समितीच्या स्थापनेपासून ठाकूर, ठाकर जमातीचा दावा नाकारलेल्या प्रकरणाची यादी (नांव, पत्ता नाकारण्याचे कारण) (४) नागपूर समितीद्वारा ठाकूर, ठाकर जमातीचा दावा केलेल्या उमेदवाराला वैधता प्रमाणपत्रे दिलीत, त्यासंबंधीची यादी, नांव,

पत्ता, वैधता प्रमाणपत्र क्रं. माहिती. वैधता प्रमाणपत्र प्रलंबीत प्रकरणाची यादी तसेच अपील प्रकरणाची यादी. नाकारलेल्या प्रकरणाची यादी. नागपूर विभागातील अनुसूचित ठाकूर जमातीच्या लोकांनी १९५० पूर्वीचे महसुली पुरावे दिल्यानंतरही वैधता प्रमाण पत्र दिल्या जात नाही. कागदपत्रे योग्य असली तरी संस्कृती न जुळल्यामुळे वैधता प्रमाणपत्र नाकारल्या जाते. माना समाजाच्या प्रकरणात हे सिध्द झाले की, प्रत्येक एन्ट्री स्वतंत्र आहे. प्रत्येक एन्ट्री मध्ये कामा दिलेला आहे त्यामुळे एकमेकाशी अफिलिटी दाखविण्याची गरज नाही ही सूचना असूनही अन्याय संपता संपत नाही. त्यामुळे संघटनेला उपरोक्त ४ मुद्यांची माहिती त्वरीत पाठवावी."

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २२.१२.२००६ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) व कलम २ (झ)(एक) नुसार माहिती व अभिलेख या अर्थसंज्ञेनुसार कोणताही दस्तऐवज हस्तलिखित फाईल असा होतो. तेव्हा शासनाच्या अभिलेख्यमध्ये उपलब्ध असलेली माहिती ही कागदपत्राच्या स्वरुपात पुरविणे अपेक्षित आहे. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १२.१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दिनांक ३.५.२००७ रोजी अपील विहित कालावधीत न दाखल केल्याने आपले अपील फेटाळण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८.५.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे.

सदरच्या अपीलाच्या संदर्भामध्ये उत्तरवादी यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे.

" उक्त अपीलकर्ता श्री गजानन मधुकर इंगळे व त्यांचे बंधु श्री राजू मधुकर इंगळे यांनी मागितलेली माहितीमध्ये साम्यता आहे. मा. राज्य माहिती आयुक्त यांनी अपील क्रं. ६४३/२००७ दिनांक २६.३.२००८ अनवये खालील आदेश पारित केले आहे.

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशत: मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना उत्तरवादी यांनी त्यांचे कार्यालयातील प्रमाणपत्र तपासण्यासाठी आलेल्या अर्जाच्या नोंदणी वहीमधून(ठाकूर) जमातीच्या उमेदवारांच्या संदर्भातील माहिती अपीलकर्ता यांनी तपासणी अंती छायांकित प्रति विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. सदरची माहिती उपलब्ध करुन घेण्याचे दृष्टीने अपीलकर्ता यांनी उत्तरवादी यांचे कार्यालयात वेळ व तारीख कळवून प्रत्यक्ष हजर होऊन नोंदणी वहीच्या अभिलेख्याची १९९२ ते २००१ पर्यंत पाहणी (नियमाने पाहाणी फी भरुन) करुन त्यातील ठाकूर जमातीच्या आलेल्या अर्जाचे संदर्भातील माहितीची नोंद ही स्वत: तपासून उपलब्ध करुन घ्यावी. त्यानंतर २००१ पासून संगणकामध्ये पंजीबध्द केलेल्या प्रकरणाची तशा प्रकारे नोंदी घेवून माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

३. सदरची माहिती उपलब्ध करुन देतांना अपीलकर्ता सोबत एक व कार्यालयातील एक कर्मचारी त्या ठिकाणी उपस्थित असावा.

सदर आदेशानुसार उक्त क्रं.२ अन्वये अद्यापही श्री राजू मधुकर इंगळे यांनी या कार्यालयास वेळ व तारीख कळविलेली नाही. त्यामुळे त्यांना माहितीची आवश्यकता नाही, हे स्पष्ट होते. निव्वळ माहितीचा अधिकार प्राप्त झालेला म्हणून जन माहिती अधिकारी तथा अपीलीय अधिकारी यांना वेठीस धरणे ही बाब स्पष्ट होते. तेव्हा सदर अपील हे खारीज करण्यास विनंती करण्यांत येत आहे. "

यावरुन असे दिसून येते की, श्री गजानन मधुकर इंगळे व श्री राजू मधुकर इंगळे हे दोनही भाऊ असून एकच माहिती ते वेगवेगळे अनेक अर्ज करुन मागत असतात व त्याकरीता श्री राजू मधुकर इंगळे यांचे अपील क्रमांक ६४३/२००७ मध्ये दिनांक २६.३.२००८ रोजी वर नमूद केलेला निर्णय दिलेला असून सुध्दा माहिती प्राप्त करण्याकरीता त्यांनी कार्यालयास तारीख व वेळ कळविलेली नाही. व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी खुलाशात म्हटल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांना वेठीस धरण्याकरीता ते सदरचे अर्ज सादर करीत असतात असे दिसून येते. तसे त्यांचे जात पडताळणीचा अर्ज पंलंबीत आहे असेही जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. यावरुन मागितलेली माहिती कोणत्याही व्यापक जनहिताचे उद्येशाने मागितली नसून स्वहिताकरीता मागितली ओ असे दिसून

येते. व त्यामुळे सदरचे अपील सुध्दा खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांनी त्यांच्या माहितीच्या अर्जामध्ये मागितलेली माहिती ही व्यापक स्वरुपात आहे व तीच माहिती त्यांचे बंधु श्री राजू मधुकर इंगळे यांनी अपील क्रमांक ६४३/२००७ मध्ये मागितलेली होती. त्याकरीता त्यांचे अपील हे मंजूर करुन माहिती उपलब्ध करुन घेण्याकरीता तपासणी फी भरुन तपासणी करण्यासाठी तारीख व वेळ कळवावा असे कळविलेले असून सुध्दा त्यांनी तारीख व वेळ कळविलेली नाही. तसेच तपासणी फी भरलेली नाही व त्यामुळे श्री गजानन मधुकर इंगळे व श्री राजू मधुकर इंगळे यांनी मागितलेली माहिती ही एकच असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-१५.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**